लोकमत पू. पान क्र. 2

# आयुक्तांचे आदेश तरी फाइल पोहोचत नाही

## भाजपचा आरोप : आंदोलन छेडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतरही पाण्याची फाइल त्यांच्या टेबलपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप भाजपने केला आहे. अधिकारी-कर्मचारी पाण्याच्या फाइलला हात लावत नाहीत. मनपाचा पाणीपुरवठा विभाग टँकर माफियांसाठी किती दिवस काम करणार, पाण्यासाठी किती लोक महापालिकेत फेऱ्या मारणार, असे अनेक प्रश्न उपस्थित करत भाजपने लवकरच पाण्यासाठी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

वसईतील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्यासाठी त्रस्त आहेत. तालुक्यातील नागरिकांच्या या मूलभूत सुविधेची गरज लक्षात घेऊन केंद्र शासनाने अमृत योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी विविध जलप्रकल्पांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला. नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करून सूर्या पाणी प्रकल्पातून ८५ एमएलडी पाणी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे मनपाकडे मुबलक पाणी उपलब्ध आहे. मात्र ते नागरिकांपर्यंत पोहोचत नाही.



### आयुक्तांना पत्र लिहून केली कारवाईची मागणी

- ८५ एमएलडी अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यानंतर सर्व नागरिकांच्या गरजा भागविण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे पाइपलाइनची तपासणी व साफसफाई केल्यानंतर नागरिकांनी घरपट्टी भरून नवीन नळजोडणी घेण्याचे आवाहन मनपा आयुक्तांनी केले होते. मात्र, मनपात बसलेले काही बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी पाण्याच्या फाइलला हात लावत नाहीत.
- अशा परिस्थितीत नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने टँकरचे पाणी घ्यावे लागते, असे भाजपचे वसई जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी म्हटले आहे. तर याबाबत बारोट यांनी बुधवारी आयुक्तांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे. आयुक्तांनी ही बाब गांभीर्याने न घेतल्यास आगामी काळात भाजप तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे बारोट यांनी पत्रात म्हटले आहे.

पू. पान क्र. 3

# उसाची मशिन चोरीला

नालासोपारा : तुंगारफाटा येथील मंगलमूर्तीनगर येथील बिल्डिंग नंबर २४ मध्ये राहणारे समरजित यादव (३४) यांची ४५ हजार रुपये किमतीची उसाचा रस काढण्याची मशिन चोरीला गेली आहे. समरजित यांनी २१ सप्टेंबरला रात्री तुंगारेश्वर गेटसमोरील यादव कम्पाऊंड येथे ती मशीन ठेवली होती; पण ती मशिन नंतर सापडली नाही. त्यांनी रविवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार दिली. उमाकांत जैस्वाल, गौरव सिंग आणि सलमान खान या तिघांनी चोरी करून मशीन नेल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# मुलीवर बापाने केला अत्याचार



नालासोपारा : नालासोपारा शहरात आरोपी सावत्र बापाने आपल्या १२ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना शनिवारी रात्री घडली आहे. ३७ वर्षीय आरोपी सावत्र बापाने राहत्या घरी पीडित मुलीला मारण्याची धमकी देऊन वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध केले आहे. मुलीच्या तक्रारीवरून पेल्हार पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल करून आरोपी बापाला अटक केली आहे.

CamScanner

लोकमत पु.
पान क्र. ४

# 'पीएम किसान'चे अपडेट; ई-केवायसी करताना सावधान!

## फसव्या लिंक क्लिक करताच शेतकऱ्याची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** केंद्र सरकारकडून चालविल्या जाणाऱ्या पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. या योजनेद्वारा पात्र शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा दिला जातो; मात्र याच योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. या योजनेचे खाते अपडेट करा म्हणून लिंकचा मेसेज येतो आणि शेतकऱ्यांच्या बँकेचे खातेच रिकामे होत असल्याच्या तक्रारी सायबर सेलकडे दररोज प्राप्त होत आहेत. त्यामुळे अशा फसव्या लिंकपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.




### 'सायबर'कडे एकही शेतकऱ्याची तक्रार नाही

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तलयात मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत 'पीएम किसान'चे ई-केवायसी करताना एकाही शेतकऱ्याची फसवणूक झाले नसल्याचे सायबर अधिकाऱ्यांनी 'लोकमत'ला सांगितले.

### ई-केवायसीच्या नावे फसवणूक

मागील काही दिवसांपासून सोशल मीडियातून पीएम शेतकरी सन्मान योजनेच्या नावाखाली आपले खाते अपडेट करा, सन्मान निधी जमा झाला का चेक करा, तुमचा अडकलेला हप्ता मिळवा, तुमचा हप्ता आताच मिळवा, अशा एक ना अनेक प्रकारच्या मेसेजमधून अशी एक लिंक 'व्हायरल' होत आहे. या लिंकवर क्लिक करताच शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे.

### सायबर सेलशी साधा संपर्क

या लिंकवर क्लिक केल्यानंतर फोनमध्ये ॲप्लिकेशन डाऊनलोड होते. त्यानंतर मोबाइल आणि सिमकार्ड हॅक होते. मोबाइल आणि सिमकार्डचा कंट्रोल घेतला जातो. आपली फसवणूक झाली असेल तर तत्काळ बँकेला अथवा सायबर सेलशी संपर्क करून तक्रार दाखल करावी.
- सुजितकुमार गुंजकर, पोलिस निरीक्षक, सायबर सेल

### अनोळखी लिंक क्लिक करू नका

पीएम किसान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. यासाठी कोणताही कॉल, मेसेज किंवा कोणतीही अनोळखी लिंक आली असेल तर चुकूनही त्यावर क्लिक करू नका, अन्यथा फसवणूक करणारे फसवणूक करू शकतात.



वसईच्या अनेक रस्त्यांवर अनधिकृत गॅरेज आणि वाहने विक्री करणाऱ्या दुकानांनी अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

# रस्ते हे गॅरेज, वाहन विक्री व्यावसायिकांना आंदण

## वसईकरांसाठी वाहतूककोंडी नित्याची

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईच्या अंबाडी रोड व गुरुद्वारा पंचवटी नाका ते सेंट फ्रान्सिस विद्यालय या रस्त्यावर अनधिकृत गॅरेज आणि वाहने विक्री करणाऱ्या दुकानांनी अतिक्रमण केले आहे. याचा त्रास सामान्यांना सहन करावा लागत आहे. या समस्येविरोधात वसई भाजप निवडणूक प्रमुख मनोज पाटील यांनी मनपा आयुक्त अनिलकुमार पवार व वाहतूक शाखा वसईच्या वाहतूक वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना निवेदन देऊन संबंधितांविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

पाटील यांच्यासह बाळा सावंत, सिद्धेश तावडे, शेमल आजागिया, प्रणीत कोप्पीकर आदींच्या शिष्टमंडळाने हे निवेदन दिले आहे.

- अंबाडी मुख्य रस्ता तसेच शंभर फुटी रस्ता हा रेल्वे स्थानकाला लागून आहे. दिवसभर येथे वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच रस्त्यांच्या दोन्ही बाजूस अनधिकृत गॅरेज व वाहने खरेदी-विक्री करणाऱ्या दुकानदारांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात वाहतूक पोलिस व मनपाकडे वारंवार तक्रारी दिलेल्या आहेत.
- वाहनतळाअभावी नागरिकांना वाहने रस्त्याच्या कडेला उभी करावी लागतात. ही वाहने वाहतूक पोलिसांकडून वारंवार उचलून कारवाई केली जाते, असा आक्षेप मनोज पाटील यांनी नोंदवून प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. परिसरातील काही भागांत वाहनांसाठी पे अँड पार्कची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

सामना पान क्र. 7

### वसईत चाळमाफियांचा कारनामा

# बेकायदा चाळीची भिंत कोसळून ठार झालेल्या महिलेची परस्पर विल्हेवाट

## पुरावे नष्ट करण्यासाठी सीसीटीव्ही केले गायब; पंचनामा, पोस्टमार्टम न करताच अंत्यसंस्कार

वसई, दि. ७ (सा.वा.) – जेवत असतानाच बेकायदा चाळीची भिंत कोसळून त्याखाली चार मजूर दबल्याची धक्कादायक घटना वसईच्या कामण परिसरात घडली आहे. या दुर्घटनेत एक महिला मजूर जागीच ठार झाली असून अन्य तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान हे प्रकरण दडपण्यासाठी कंत्राटदारासह मालकाने परिसरातील सीसीटीव्ही गायब केले. तसेच मृत महिलेच्या नातेवाईकांना पैसे देऊन त्यांच्यावर दबाव टाकला आणि मृतदेहाचे शवविच्छेदन न करता परस्पर अंत्यसंस्कार करण्यास भाग पाडले. शुक्रवारी घडलेल्या या घटनेचा आज बोभाटा होताच याची गंभीर दखल घेऊन पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. चाळमाफियांच्या या कारनाम्याने खळबळ उडाली आहे.

वसई–विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. शुक्रवारी दुपारी वसई पूर्वेच्या कामण येथील बेलकवडी परिसरात चाळींचे अनधिकृत बांधकाम सुरू होते. दुपारी दीडच्या सुमारास मजूर जेवण करण्यासाठी बसले होते. त्यावेळी निकृष्ट असलेली भिंत अचानक कोसळली. या दुर्घटनेत रुक्षणा लहाने (२२) ही तरुणी जागीच ठार झाली तर अन्य ३ मजूर जखमी झाले. मात्र ठेकेदार आणि विकासकांनी ही दुर्घटना दडपण्यासाठी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मृत महिलेच्या नातेवाईकांवर कुठेही वाच्यता न करण्यासाठी दबाव टाकला. तसेच त्यांना पैसे देऊन मृतदेहाचे शवविच्छेदन न करता मृतदेह अंत्यविधीसाठी त्यांच्या गावी पाठवून दिला. इतकेच नाही तर पुरावा नष्ट करण्यासाठी परिसरातील गोदामाचे सीसीटीव्हीदेखील काढून टाकले.

### अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले

कामण गावातील या घटनेचा भंडाफोड होताच नायगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. तसेच दिनेश जैन (५८), नितीश जैन (३३), कन्नन सोनी (४०), फराज खान (३२) यांना अटक केली असून फरार असलेल्या प्रदीप गुप्ताचा शोध सुरू आहे. या कारवाईच्या तडाख्याने वसई, विरारमधील अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### ना परवानगी ना कामगारांची सुरक्षा

कंत्राटदार व चाळमालकाने काम करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे समोर आले आहे. इतकेच नाही तर आरसीसी बांधकामाचा नकाशादेखील अभियंत्याकडून तयार करून न घेताच मनमर्जीपणे बांधकाम सुरू होते. निकृष्ट बांधकाम आणि मजुरांच्या सुरक्षेची काळजी न घेतल्यानेच ही दुर्घटना घडल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.

CamScanner

पुढारी पान क्र. 6

# मिरा-भाईंदरच्या कत्तलखान्याची निविदा मागे

## माजी आ. नरेंद्र मेहतांचा इमारतीवरून उडी मारण्याचा इशारा; आयुक्तांनी रद्द केली निविदा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने प्रस्तावित अद्यावत कत्तलखान्यासाठी राज्य शासनाकडून ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आल्याने पालिकेने त्याची निविदा प्रसिद्ध केली. त्याला माजी आ. नरेंद्र मेहता व आ. गिता जैन यांनी तीव्र विरोध दर्शवित मेहता यांनी निविदा रद्द न केल्यास पालिका मुख्यालयाच्या इमारतीवरून उडी घेत जीव देण्याचा इशारा आयुक्तांना दिला. तर जैन यांनी मेहता यांच्यावर स्टंटबाजीचा आरोप केल्याने कत्तलखान्याचा मुद्दा चांगलाच तापला होता. अखेर सोमवारी मेहता व जैन यांनी आयुक्त संजय काटकर यांची भेट घेतल्यानंतर ती निविदा रद्द केल्याचे आयुक्तांकडून जाहीर करण्यात आल्याने मेहता यांची उडी स्थगित झाल्याची चर्चा शहरात रंगू लागली.

उत्तन' परिसरात राज्य शासनाने एमएमआरडीएच्या माध्यमातून विशेष पर्यटन क्षेत्र जाहीर केले आहे. त्याचा विकास आराखडा एमएमआरडीएने २०१७ मध्ये लागू केला. त्यात सर्वे क्रमांक २८२ हिस्सा क्रमांक ४ वरील १ हजार ६९० चौरस मीटर जागेत कत्तलखाना प्रस्तावित करण्यात आला. मात्र एमएमआरडीएने लागू केलेल्या विकास आराखड्याची मुदत २०२२ मध्ये संपुष्टात आल्यानंतर पालिकेने एमएमआरडीएच्याच निर्देशानुसार ऑक्टोबर २०२२ मध्ये प्रस्तावित कत्तलखान्याच्या विकासाकरीता तेथील जागा मालकांना जमीन संपादनासाठी नोटीसा पाठविल्या. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप पसरल्याने त्यांनी प्रस्तावित कत्तलखान्याला तीव्र विरोध दर्शविला. अगोदरच उत्तनमध्ये पालिकेचा घनकचरा प्रकल्प सुरु असून त्यामुळे तेथील ग्रामस्थ त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत ग्रामस्थांच्या माथी कत्तलखान्याचा प्रकल्प मारून त्यांचे आरोग्य नष्ट करण्याचा प्रयत्न पालिका व शासन करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला. तर या परिसरात प्रसिध्द वेलंकनी माता तीर्थमंदिर, हिंदुस्थानातील सर्वात मोठे व प्रसिद्ध पॅगोडा, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, देशातील न्यायाधीशांचे प्रशिक्षण केंद्र, चिमाजी आप्पा स्मारक, प्रख्यात धारावी मंदीर, जंजिरा किल्ला व इतर प्राचीन वास्तु असल्याने या परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ व पर्यावरण वादींचा या कत्तलखान्याला तीव्र विरोध असल्यामुळे येथील कत्तलखाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यावेळी मेहता यांच्यासह उत्तन ग्रामस्थांकडून करण्यात आली. यानंतर पालिकेने २८ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप नवीन विकास आराखड्यात भाईंदर पश्चिमेकडील गणेश देवल नगर येथील बंदावस्थेत असलेल्या मलनि:स्सारण केंद्राच्या परिसरात कत्तलखान्यासाठी आरक्षण क्रमांक ३१ प्रस्तावित केले. या परिसरात सुद्धा जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र बावन जिनालय असून इतर धर्मियांची सुद्धा प्रसिध्द मंदिरे असल्याने येथील भर लोकवस्तीच्या ठिकाणी प्रस्तावित कत्तलखान्याला देखील स्थानिकांनी तीव्र विरोध दर्शविला.

### काय होता शासकीय आदेश

कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यासाठी पालिकेने जिल्हा नगररचनाकार यांना तात्काळ पत्रव्यवहार करण्याची मागणी त्यावेळी मेहता यांनी तत्कालीन आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली. तसेच उत्तनमधील प्रस्तावित कत्तलखान्याच्या जमीन संपादनासाठी तेथील शेतकऱ्यांना व जमीन मालकांना पाठविण्यात आलेल्या नोटीसा रद्द करून कत्तलखान्याचे आरक्षण देखील रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर तब्बल दोन वर्षांनी आ. प्रताप सरनाईक यांनी १० जून २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्रव्यवहार केला. त्यात नमूद केल्याप्रमाणे नगरविकास विभागाने महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेंतर्गत पालिका हद्दीमध्ये अद्यावत कत्तलखाना उभारण्यासाठी ५० कोटींचा निधी मंजूर केल्याचे ५ सप्टेंबर रोजी शासकीय आदेश जारी केला. यानुसार पालिकेने ३ ऑक्टोबर रोजी त्याची निविदा प्रक्रिया सुरु केली.

### दोन्ही आजी-माजी आमदारांनी घेतली भेट

त्याची माहिती मिळताच मेहता व जैन यांनी त्याला तीव्र विरोध दर्शवित त्याची निविदा रद्द करण्याची मागणी केली. तसेच यावरून मेहता व जैन यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरु झाले असतानाच मेहता यांनी निविदा रद्द न केल्यास पालिका मुख्यालयाच्या इमारतीवरून उडी मारण्याचा इशारा आयुक्तांना दिला. त्यावर जैन यांनी मेहता यांच्यावर स्टंटबाजीचा आरोप केला. या दोन्ही आजी-माजी आमदारांनी सोमवारी आयुक्तांची भेट घेत निविदा रद्द करण्याची मागणी केली असता आयुक्तांनी निविदा रद्द केल्याचे जाहीर केले. यामुळे मेहता यांची उडी देखील स्थगित.झाल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

### मेहता यांच्या उडीच्या इशाऱ्यामुळे चर्चांना उधाण

राष्ट्रवादी (अजित पवार) च्या आमदारांनी मंत्रालय इमारतीवरून उडी घेल्यानंतर त्यांना तेथील जाळीने तारल्याची घटना ताजी असतानाच मेहता यांच्या उडीच्या इशाऱ्यामुळे शहरात विविधांगी चर्चांना उधाण आले होते. प्रस्तावित कत्तलखान्यात राज्य माता दर्जा प्राप्त झालेल्या गाईंची देखील कत्तल होणार असल्याचा संभ्रम निर्माण झाल्याने विहिंपच्या मिरा-भाईंदर शाखेने पालिकेवर मोर्चा काढला होता.

CamScanner

पुढारी पान क्र. १

पुढारी पु. पान क्र. 1

## स्वस्त घराच्या नावे फसवणूक

**पालघर :** स्वस्त घर देण्याच्या नावाखाली हरिश्चंद्र यादव या व्यक्तीची फसवणूक झाल्याचा प्रकार वालीव पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये घडला आहे. स्वस्त घर देतो असे आमिष अवनी बिल्डर आणि डेव्हलपर कंपनीचे मालक आशिष मिश्रा आणि विकास सिंग यांनी यादव यांना दिले. त्याद्वारे अडीच लाख रुपये घेतले होते. मात्र पैसे परत न करता घरही दिले नाही व आपली फसवणूक झाली हे समजता यादव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी शनिवारी पुन्हा दाखल केला आहे.

## रिक्षा चोरली

**पालघर :** पेल्हर पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये रिक्षा चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. शुभम जयस्वाल यांची ही रिक्षा शुक्रवारी श्रीराम नगर नाक्याजवळ एका दुकानासमोर पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्यानंतर जयस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणाची आत्महत्या

**पालघर :** विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये भोईरपाडा परिसरात असलेल्या शिवकृपा सोसायटी मधील सत्यनारायण महापात्रा या ३० वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. घरातील सिलिंग हुकला गळफास घेऊन त्याने ही आत्महत्या केली.

## टेम्पोच्या धडकेत चिमुकलीचा मृत्यू

**नालासोपारा :** विरार पश्चिमेकडील डोंगरपाडा परिसरातील दूध वाहून नेणाऱ्या पिकअप टेम्पोने दोन वर्षाच्या चिमुकलेला चिरडल्याची घटना घडली आहे. रिया सिंग असं या चिमुकलीचे नाव असून आज सकाळी आज सकाळच्या सुमारास आत्माराम पार्क परिसरातील इमारतीच्या गेट जवळ रिव्हर्स घेणाऱ्या दुधाच्या टेम्पोने तिला धडक दिली. त्यात चिमुकलेचा जागीच मृत्यू झाला आहे. विरार पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. टेम्पोचालकाला पोलिसांनी घेतल्या ताब्यात घेतले आहे. विरार पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नैराश्येतून आत्महत्या

**पालघर :** वालीव पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये एका पन्नास वर्षे व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अफसर शेख असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव असून नैराश्येतून शनिवारी त्यांनी ही आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. स्वयंपाकगृहातील पंख्याला शेख यांनी गळफास घेतला. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली फसवणूक झालेली रक्कम परत

**मिरा रोड :** काशीगाव परीसरात राहणाऱ्या इसमाला वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाईन यु ट्यूब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल, मुव्ही रेटींगमध्ये गुंतवणुक करण्यास सांगून फसवणूक करण्यात आली होती. ही फसवणूक केलेली संपूर्ण रक्कम ४,४०,००० रुपये तक्रारदार यांना काशीगाव पोलीसांनी परत मिळवून दिले आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशीगाव पोलीस ठाणे परीसरात राहणारे बलवंतराय रामजीभाई सुरती यांना वर्क फ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन व्हीडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल , मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवून त्यांची ४,४०,००० रुपयांची फसवणूक केली होती. या फसवणूकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची तात्काळ दखल घेत झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठवण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन खात्यामध्ये रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळवण्यासाठी पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने फिर्यादी यांची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम ४,४०,००० रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली आहे.

## नोकरीच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या दाम्पत्याला अटक

**मिरा रोड :** भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या निक्की भोईर यांना मंत्रालयात लिपीक पदावर कामाला लावतो असे सांगत नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देवुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या दाम्पत्याला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. भाईंदर पश्चिम, मूर्धागाव येथे राहणाऱ्या निक्की भोईर यांना मंत्रालयामध्ये लिपीक पदावर नोकरी लावतो असे सांगितले. त्यासाठी मंत्रालयात पैसे भरावे लागतील असे खोटे सांगून आरोपी सागर चंद्रकांत कासारे व त्यांची पत्नी या दोघांनीही १ ऑगस्ट २०१८ ते १ जून २०२४ पर्यंत त्यांच्याकडुन वेळोवेळी ४,२०,००० रुपये रोख घेतले. त्यांनी नोकरीसाठी जास्त तगादा लावल्यानंतर त्यांना मंत्रालयात लिपीक पदावर नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देवून आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी आरोपी विरुध्द भाईदर पोलीस ठाण्यात १ सप्टेंबर २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दाम्पत्य आरोपींच्या ठावठिकाणाबाबत पोलिसांना काही माहीती नसताना पोलिसांनी सखोल तपास केला.आरोपी सागर चंद्रकांत कासारे हा मालाड येथे त्याच्या राहते घराचे जवळ येणार असल्याची माहीती मिळाली. त्यावेळी सापळा रचून त्याल अटक केली. तसेच महीला आरोपीलाही ताब्यात घेतले आहे.

CS CamScanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 6

# नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## अश्लील फोटो दाखवून खंडणीची मागणी

**वसई** : नालासोपाऱ्यातील एका अल्पवयीन १३ वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिच्या अश्लील फोटोंच्या आधारे धाक दाखवून २५ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी एका तरुणीसह दोघांवर पोक्सो, आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला.

पीडित मुलीची २६ वर्षांच्या तरुणीशी ओळख झाली होती. त्यानंतर २०२३ मध्ये पिडीत मुलीची एका २४ वर्षांच्या तरुणाशी ओळख करून दिली. त्यानंतर २४ वर्षांच्या तरुणाने मुलीच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत तिच्यावर अत्याचार केला. त्याचवेळी त्याने पीडितेची अश्लील छायाचित्रे काढून ओळख करून देणाऱ्याला पाठवली. त्यावेळी त्याने ही छायाचित्रे समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिली. त्या मोबदल्यात तिच्याकडून २५ हजार ५०० रुपये उकळले. मात्र पैशांची मागणी वाढत होती. त्यामुळे तिने हा प्रकार अखेर कुटुंबीयांना सांगितला. याबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर एका आरोपीला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास तुळींज पोलीस करत आहेत.

# देहविक्रय प्रकरणी ३ पीडितांची सुटका

**वसई** : वसई पूर्वेकडील मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ससूनवघर येथील एका हॉटेलमध्ये देहविक्रय व्यवसाय केल्याप्रकरणी ४ आरोपींना अटक, तर ३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ससूनवघर येथील सेल्फी ढाबा हॉटेलमध्ये देहविक्रय व्यवसाय करणाऱ्या १८ ते ३३ वयोगटातील ३ पीडित महिलांची सुटका करण्यात यश आले आहे. याप्रकरणी मॅनेजर बाबूलाल पासवान (३७), वेटर देवनंदन पासवान (२९), शिवानंद पासवान (२१) आणि अशोक यादव (३८) या चौघांनी तीन पीडित महिलांना प्रवृत्त करून वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवून स्वतःच्या फायद्यासाठी रक्कम स्वीकारली. म्हणून पोलीस अंमलदार रोहित वाणी (२४) यांनी नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार देऊन आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# काशिमिऱ्यात घोडागाड्यांची शर्यत; तिघांना अटक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई :** मुंबई-अहमदाबाद महामार्गाजवळील वरसावे येथे घोडागाडी शर्यत आयोजित करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी प्राण्यांसाठी काम करणाऱ्या पेटा संस्थेने दिलेल्या तक्रारीनुसार काशिगाव पोलिसांनी कारवाई करून सहा घोड्यांची सुटका केली आणि तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

वरसावे पुलावर मध्यरात्री घोडागाडी शर्यत होणार असल्याची माहिती पेटा (पिपल फॉर द एथिकल ट्रिटमेंट ऑफ ॲनिमल या प्राण्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेने मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तांना दिली होती. त्यानुसार मध्यरात्री काशिगाव पोलिसांनी या वरसावे नाका परिसरात गस्त घातली होती. रात्री साडेबाराच्या सुमारास काही तरुणांचा गट घोडागाडी शर्यत करत असल्याचे आढळून आले. पोलिसांच्या पथकाने त्यांना अडवून ताब्यात घेतले आणि घोड्यांची सुटका केली.

या कारवाईत ओवीन डिमेलो, रन्सी कालतील आणि बेनी परेरा या तिघांना अटक केली आहे. घोडागाडी शर्यत लावून प्राण्यांना क्रूर वागणूक देणे, सार्वजनिक रहदारीस अडथळा आणल्याबद्दल भारतीय न्याय दंडसंहितेच्या कलम २९१, २८१, १२५, ३(५) तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबधक अधिनियम १९६० च्या कलम ११(१) (अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपी भाईंदरच्या उत्तन गाव परिसरात राहणारे असून ऊरूस यात्रेच्या निमित्ताने त्यांनी ही बेकायदा घोडागाडी शर्यत लावली होती. पोलिसांनी या कारवाईत सहा घोड्यांची सुटका केली असून त्यांना वसईच्या सकवार येखखील पशू आश्रमात ठेवण्यात आले आहे.

पृ. पान क्र. 4

# वसईमधील मनसे कार्यकर्ते बहुजन विकास आघाडीत

**वसई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहरात उलथापालथ सुरू आहे. रविवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी बहुजन विकास आघाडीत प्रवेश केला आहे.

लोकसभा निवडणुकीत मनसे ही महायुतीच्या सोबत होती. वसई-विरारमध्येही महायुतीला चांगले मताधिक्य मिळाले होते. आता विधानसभा निवडणुका तोंडावर सर्वच पक्ष सक्रिय झाले आहेत. रविवारी मनसे विभाग अध्यक्ष महेश जयराम पालांडे, उपशहर नालासोपारा उपाध्यक्ष संकेत सुधाकर सुर्वे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी बविआ पक्षप्रमुख आमदार हितेंद्र ठाकूर, नालासोपाराचे आमदार क्षितीज ठाकूर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला आहे.

म.टा. पान क्र. १

# आता हातोडा अटळ

## नालासोपाऱ्यातील ४१ बेकायदा इमारतींवर कारवाई होण्याचा मार्ग मोकळा

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**
**म. टा. वृत्तसेवा, वसई**

नालासोपारा पूर्वेकडील अग्रवाल नगरी येथे क्षेपणभूमी व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर खासगी विकासकाने बेकायदा उभारलेल्या ४१ इमारतींवर अखेर हातोडाच पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना अखेरची आशा असलेल्या सर्वोच्च न्यायालयानेही त्यांचे अपिल नुकतेच फेटाळले आहे. त्यामुळे या इमारतींमध्ये राहणाऱ्या सुमारे साडेचार हजार नागरिकांच्या निवाऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे.

रहिवाशांच्या वतीने जय अंबे वेल्फेअर सोसायटी व अन्य काहींनी केलेले अपिल सर्वोच्च न्यायालयाचे न्या. हृषिकेश रॉय व न्या. एस. व्ही. एन. भट्टी यांच्या खंडपीठाने नुकतेच फेटाळून लावले.

'क्षेपणभूमी व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी आरक्षित जमिनीवरच बेकायदा इमारती उभ्या आहेत, हे सुस्पष्ट आहे. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इमारती रिकाम्या करण्याचा उच्च न्यायालयाने दिलेला आदेशही योग्यच आहे. कारण सार्वजनिक प्रकल्पासाठी राखीव ठेवलेल्या जागा अशाप्रकारे व्यापल्या जाऊ शकत नाहीत. खासगी हितांपेक्षा सार्वजनिक हित महत्त्वाचे आहे', असे सर्वोच्च न्यायालयाने अपिल फेटाळताना नमूद केले.

या इमारती जमीनदोस्त करण्याचा प्रशासनाचा मार्ग मोकळा असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानुसार, वसई-विरार महापालिकेकडून तोडकामाच्या कारवाईचे नियोजन करण्याच्या हालचाली सुरू आहेत. पालिकेने या इमारतींमधील सुमारे बाराशे कुटुंबांना घरे रिकामी करण्याविषयी नोटीस दिली आहे. तसेच कारवाईच्या वेळी पोलिस संरक्षण (पान १०वर)

- **सर्वोच्च न्यायालयानेही याचिका फेटाळली**
- **महानगरपालिकेकडून हालचालींना वेग**
- **साडेचार हजार जणांच्या निवाऱ्याचा प्रश्न**



### काय आहे प्रकरण ?

माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व त्यांचे पुतणे अरुण गुप्ता यांनी सन २००६मध्ये ही आरक्षित जमीन बळकावून बेकायदा इमारती बांधल्याचा आरोप आहे. बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र तसेच इतर मंजुरींबाबतची बनावट कागदपत्रे तयार करून २०१० ते २०१२ या कालावधीत या ४१ बेकायदा इमारती उभारण्यात आल्या. तसेच इमारतींमधील घरे विकण्यात आली. विशेष म्हणजे घरांच्या विक्री करारनाम्यांची नोंदणीही निबंधक कार्यालयांत करण्यात आली होती.

### 'पुनर्वसनाचा विचार करावा'

'रहिवाशांपैकी अनेक जण कदाचित निष्पाप ग्राहक असतील. त्यांना आपला निवाऱ्याचा हक्क जाण्याची भीती आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ८ जुलै २०२४ रोजी तोडकामाचा आदेश देताना रहिवाशांना खासगी विकासकाविरोधात न्यायालयात खटला भरण्याची मुभा दिली. त्यामुळे आम्ही अपिल फेटाळत असलो तरी राज्य सरकारच्या प्रशासनांनी रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी काही योजना आणता येईल का, याचा विचार करावा. कारवाईमुळे बाधित होणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन करता येईल का, याची व्यवहार्यता तपासून त्याविषयीच्या शक्यतांचा सरकारी प्रशासनांनी विचार करावा', अशी सूचनाही सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.

**“ न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नालासोपाऱ्यातील या ४१ इमारतींवर कारवाई करणे बंधनकारक आहे. पुनर्वसन आणि इमारतींवरील कारवाई या दोन्ही स्वतंत्र बाबी आहेत. या इमारतींपैकी रिकाम्या इमारतींवरील कारवाईसाठी पोलिस बंदोबस्त मिळण्याबाबत पोलिसांना पत्र पाठवण्यात आले आहे. पुनर्वसनाच्या अनुषंगाने महापालिका राज्य शासनाकडून मार्गदर्शन सूचना प्राप्त करून घेणार आहे.**

**-अनिलकुमार पवार,**
आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका

## आता हातोडा अटळ

(पान एकवरून)

मिळावे, याकरिता पोलिस प्रशासनाकडे पालिकेकडे पत्रव्यवहार सुरू केला आहे. त्याचबरोबर कारवाईपूर्वी या इमारतींचा वीजपुरवठा तोडण्यात यावा यासाठी महावितरणलाही पालिकेने पत्र पाठवले आहे.

**उच्च न्यायालयाने दिली होती ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत**

मोहन पटेल व अन्य काहींच्या रिट याचिकेमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने कारवाईचे निर्देश दिल्यानंतर काही रहिवाशांनी आपली घरे वाचवण्यासाठी ॲड. अजय जैस्वाल यांच्यामार्फ अर्ज करून प्रयत्न केला होता. मात्र, त्यावरील सुनावणीनंतरही न्या. एम. एस. सोनक व न्या. कमल खाता यांच्या खंडपीठाने ८ जुलै रोजी संरक्षण देण्यास नकार दिला. मात्र, त्यावेळी पावसाळा सुरू असल्याचे पाहून खंडपीठाने रहिवाशांना घरे रिकामी करण्यासाठी ३० सप्टेंबरची मुदत दिली होती. त्या कालावधीत घरे रिकामी करण्याची लेखी हमी देण्याची अटही रहिवाशांना घातली होती. त्यानंतर अन्य काहींनी पुन्हा स्वतंत्र रिट याचिका करून इमारती वाचवण्याचा प्रयत्न केला. 'इमारतींचे बांधकाम नियमित करण्यासाठी अर्ज करण्याची मुभा द्यावी. उल्हासनगरमधील बेकायदा इमारती अधिकृत करण्याच्या योजनेप्रमाणे आमच्यासाठी योजना आणण्याचा आदेश सरकारला द्यावा', असे युक्तिवादही रहिवाशांतर्फे करण्यात आले होते. मात्र, खंडपीठाने १ ऑक्टोबर रोजी ते युक्तिवादही फेटाळून लावले होते. त्यानंतर जय अंबे सोसायटीने सर्वोच्च न्यायालयात अपिल केले होते.




म. टा. पु. पान क्र. 1

# महामार्गावरील कोंडी वाढली

## निकृष्ट कॉंक्रिटीकरण, खड्डे, माती-कचऱ्याचा भराव कारणीभूत

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहतूककोंडीची समस्या पुन्हा एकदा वाढली असून यामुळे पुन्हा एकदा महामार्ग चर्चेत आला आहे. महामार्गावरील वाढलेली वाहने, कॉंक्रिटीकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम, महामार्गालगत माती - कचऱ्याचा भराव, खड्ड्यांमुळे महामार्गावर कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. त्यामुळे काही दिवसांपासून वाहतूककोंडीच्या समस्येला वाहनचालकांना सातत्याने तोंड द्यावे लागत आहे.

मुंबई - अहमदाबाद महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. हा महामार्ग मुंबई आणि गुजरातसह इतर अनेक शहरांना जोडणारा आहे. त्यामुळे या महामार्गावरून दररोज मुंबई, ठाणे, पालघर, वसई - विरार, मिरा-भाईंदर, गुजरात यासह इतर भागात ये-जा करणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण करण्याचे कामदेखील सुरू आहे. हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. तर दुसरीकडे रस्त्याच्या कामामुळे कोंडीसह प्रदूषणदेखील मोठ्या प्रमाणात होत आहे. वाढती वाहने, रस्त्याच्या दुतर्फा करण्यात येणारा कचरा, राडारोडा आणि माती भराव, खड्डे यामुळे कोंडीची समस्या वाढत आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिकच बिकट झाली होती. त्यानंतर खड्ड्यांबाबत आणि महामार्गावरील इतर समस्या जाणून घेण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी डॉ. गोविंद बोडके यांनी महामार्गाचा घोडबंदर ते मालजीपाडा असा दौरा केला होता. या दौऱ्यानंतर महामार्ग प्रशासनाने उपायोजना केल्यानंतर कोंडी काहीशी कमी झाली होती. मात्र ही समस्या पुन्हा एकदा वाढली आहे.

ठाण्यात नुकत्याच झालेल्या पंतप्रधानांच्या दौऱ्यामुळे येथे कोंडी झाल्याने ५ ते ६ तास वाहनचालकांना कोंडीत अडकावे लागले होते. तर इतर सुट्टीच्या दिवशी किंवा आठवड्याच्या शेवटच्या दिवसात मोठी वाहतूककोंडी होत असते. महामार्गावर होत असलेल्या कोंडीचा फटका हा वसईतील उद्योगांना मोठ्या प्रमाणावर बसत आहे. वसईत असलेल्या औद्योगिक वसाहतीत अनेक लहान-मोठे उद्योग आहेत. त्यांच्या मालाची वाहतूक ही महामार्गावरूनच होत असते. मात्र वाहतूककोंडीमुळे त्याचा फटका येथे बसत आहे. त्यामुळे महामार्गावरील कोंडी सोडविण्याची मागणी सध्या वाहनचालक करत आहेत. वाहनतळ बनविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी देखील वाहनचालक करत आहेत.

### अंतर्गत कोंडीने त्रस्त

मिरा-भाईंदरमधील अंतर्गत सर्वच रस्त्यांवरून प्रवास करताना नागरिकांना वाहतूककोंडीला सामोरे जावे लागत आहे. यामागे कॉंक्रीटकरणासाठी खोदण्यात आलेले रस्ते, रस्त्यालगतचा खोदण्यात आलेला भाग वाहतुकीसाठी सुरळीत न करणे, रस्त्यावर वाहने उभी करणे आदी कारणेदेखील आहेत.

CamScanner

NBT पान क्र. 8


# विवादित स्लॉटर हाउस का टेंडर आखिरकार हुआ रद्द

## राजनीतिक विवाद शुरू होने के बाद मनपा प्रशासन ने लिया फैसला

■ अमित तिवारी, मीरा-भाईंदर

आखिरकार उत्तन में प्रस्तावित स्लॉटर हाउस का टेंडर मीरा-भाईंदर मनपा ने रद्द कर दिया है। टेंडर के रद्द होते ही शहर के नेताओं में इसके श्रेय को लेकर होड़ शुरू हो गई है। जहां विधायक गीता जैन टेंडर रद्द होने का श्रेय ले रही है, तो पूर्व विधायक नरेंद्र मेहता भी इसमें पीछे नहीं है। उन्होंने इसका श्रेय उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस को दिया है। मेहता ने बताया कि फडणवीस ने इस संबंध में मनपा आयुक्त संजय काटकर को तलब किया था। फडणवीस के हस्तक्षेप के बाद ही टेंडर को रद्द किया गया। मनपा के उच्च अधिकारी ने फडणवीस के कॉल की पुष्टि की है।

बता दें कि 4 अक्टूबर को मीरा-भाईंदर मनपा ने उत्तन में स्लॉटर हाउस के लिए टेंडर जारी किया था। 6 अक्टूबर को नरेंद्र मेहता ने टेंडर रद्द करने की मांग करते हुए आंदोलन की चेतावनी दी। मेहता की चेतावनी के बाद गीता जैन भी हरकत में आ गई। सोमवार को जैन भी मनपा आयुक्त से मिलीं और टेंडर रद्द करने की मांग की।




यहां बनने वाला था स्लॉटर हाउस।

### जैन की मंशा पर उठाए सवाल

मेहता ने जैन की मंशा पर सवाल उठाते हुए उनके 4 अक्टूबर वाले पत्र को भी संदेह के घेरे में लिया है। मेहता ने कहा कि जब टेंडर 4 अक्टूबर को शाम 6:55 बजे वेबसाइट पर प्रकाशित हुआ था, जब जैन उसी दिन टेंडर रद्द करने के लिए पत्र कैसे दे सकती है? बकौल जैन, उन्होंने 4 अक्टूबर को टेंडर रद्द करने के लिए आयुक्त को पत्र दिया था। टेंडर के बारे में जानकारी न होने पर मेहता ने जैन की काबलियत पर भी सवाल उठाए।

### नेताओं में श्रेय लेने की होड़

मनपा की ओर से टेंडर रद्द होते ही इसका श्रेय लेने की भी होड़ शुरू हो गई है। जैन समर्थको ने टेंडर रद्द होने का श्रेय विधायक को दिया, तो मेहता समर्थको ने पूर्व विधायक को जरिया बताया। बीजेपी नेता रवि व्यास भी श्रेय लेने की रेस में कूद पड़े।

"स्लॉटर हाउस का टेंडर हो जाना दुर्भाग्यपूर्ण है। जनप्रतिनिधियों की नैतिक जिम्मेदारी है कि शहरवासियों की भावनाओं का खयाल रखें।
*- गजेंद्र भंडारी, अध्यक्ष, राजस्थानी जनजागरण सेवा संस्था*

"यह कैसे संभव है कि 50 करोड़ रुपये मंजूर हो गए और विधायक गीता जैन को इसकी जानकारी नही है? ऐसे मे कई सवाल उठते है।
*- ओमप्रकाश गाड़ोदिया, पूर्व नगरसेवक*

NBT Lens
समझिए खबरों के अंदर की बात

### क्या किसी को नहीं थी जानकारी?

5 सितंबर 2024 को राज्य सरकार ने जीआर निकालकर स्लॉटर हाउस के लिए 50 करोड़ की निधि मंजूर की थी। यह विधायक निधि न होकर सामान्य निधि है। हालांकि, यही से राजनीति शुरू हुई कि जो राशि मंजूर हुई है, उसकी जानकारी शहर के जनप्रतिनिधियो को कैसे नही थी? सूत्रों का कहना है कि टेंडर की पूरी प्रक्रिया की जानकारी जनप्रतिनिधियो को थी। जब इस पर राजनीति तेज हुई, तो मनपा प्रशासन को टेंडर रद्द करने का फैसला लेना पड़ा।

# दीवार ढही, महिला की मौत, 3 दिन बाद FIR

## शिंदे शिवसेना के दबाव में पुलिस ने की कार्रवाई

■ निसं, वसई: नायगांव पुलिस स्टेशन क्षेत्र के कामन इलाके में 4 सितंबर को अवैध निर्माण के दौरान दीवार ढह जाने से चार मजदूर दब गए थे। इनमें 22 वर्षीय महिला मजूदर की मौत हो गई, वहीं अन्य तीन घायल बताए गए हैं। सूत्रों के अनुसार, हादसे के बाद भूमाफिया ने सबूत मिटाने के लिए जेसीबी की मदद से दीवार और मलबा हटाकर कर मामला रफा-दफा कर दिया था। लेकिन, शिवसेना (शिंदे गुट) के पदाधिकारियों ने नायगांव पुलिस स्टेशन में आंदोलन की चेतावनी दी, जिसके बाद पुलिस ने रविवार देर रात 6 लोगों के खिलाफ मामला दर्ज कर चार को गिरफ्तार कर लिया है।



बता दें कि वसई-विरार शहर में बड़े पैमाने पर अवैध निर्माण हो रहे हैं। कोर्ट की मनाही आदेश के बाद भी मनपा अवैध निर्माण रोकने में नाकाम है। मनपा के प्रभाग-जी वालीव अंतर्गत कामन क्षेत्र में सबसे अधिक अवैध निर्माण हो रहे हैं। शुक्रवार को बेलकडी इलाके में अवैध निर्माण के दौरान वहां काम कर रहे मजदूर खाना खा रहे थे, तभी उनके ऊपर दीवार गिर गई। हादसे में रुक्षणा महेश लाहंगे (22) की मौके पर ही मौत हो गई, जबकि 3 अन्य मजदूर घायल हो गए। हादसे के बाद अवैध निर्माणकर्ता ने दुर्घटना को छिपाने और सबूत नष्ट करने की कोशिश की। उसने मृत महिला के परिजन पर दबाव बनाया कि किसी को घटना के बारे में न बताएं। परिजन को पैसे देने के बाद शव को बिना पोस्टमॉर्टम के ही दाह संस्कार के लिए मूल गांव डहाणू स्थित गिम्भल पाडा भेज दिया। आरोप है कि उसने पुलिस को भी मैनेज कर लिया था। हालांकि, शिवसेना जिला प्रमुख निलेश तेंडोलकर ने हंगामा किया, तब मामला दर्ज किया गया। उन्होंने मनपा के संबंधित अधिकारियों पर भी मामला दर्ज करने की मांग की है।

नवभारत पु. पान क्र. 3

# मीरा-भाईंदर में कत्लखाने का मोर्चा निकालकर विरोध

भाईंदर. कत्लखाने के विरोध में अंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल ने मीरा-भाईंदर मनपा मुख्यालय के बाहर सोमवार को मोर्चा निकाला. यह मोर्चा कोंकण प्रांत के संयुक्त महामंत्री बीएल भारद्वाज के नेतृत्व में निकाला गया. इस मोर्चे में सनातन धर्म को मानने वाले लोग बड़ी संख्या में शामिल हुए. सभी ने मनपा प्रशासन के खिलाफ जमकर नारेबाजी की. इस मामले में अंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल के शिष्टमंडल ने मनपा आयुक्त को ज्ञापन देकर 40 करोड़ रुपए की लागत से बनाए जाने वाले कत्लखाने के टेंडर को निरस्त करने की मांग की है. बीएल भारद्वाज ने कहा कि हाल ही में गौ माता को महाराष्ट्र के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने राज्य माता का दर्जा दिया है. वहीं दूसरी ओर मीरा-भाईंदर की मनपा प्रशासन उत्तन परिसर में 40 करोड़ रुपए की लागत से कत्लखाने बनाने जा रही है, जिसका अंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल विरोध करता है.



CS CamScanner

दैनिक भास्कर पान क्र. ३

# स्टेशन-पूनम सागर रोड की स्ट्रीट लाइट्स बंद

## ▪ नवरात्र में युवतियों और महिलाओं को असुरक्षा का भय

अनिल चौहान | भायंदर

शास्दीय नवरात्र में लोग खासकर लड़कियां और महिलाएं गरबा-डांडिया खेलने रात में घर से बाहर निकल रही हैं। मीरा रोड स्टेशन-पूनम सागर कॉम्प्लेक्स रोड पर स्ट्रीट लाइट्स बंद होने से घना अंधेरा रहता है, जिससे युवतियों, महिलाओं और दुकानदारों में असुरक्षा का भय बना हुआ है। मीरा रोड स्टेशन से भक्ति वेदांत हॉस्पिटल के बीच की दो से तीन किलोमीटर लंबी इस सड़क पर शाम ढलते ही अंधेरा छा जाता है। जिससे राह चलने और तड़के सुबह मॉर्निंग वॉक पर निकलने वाले लोगों को काफी परेशानी हो रही है। शाम से लेकर देर रात तक काम से घर लौटने वाले निवासियों खासकर महिलाओं और सड़क किनारे दुकानदारों में असुरक्षा का भय है।



डिवाइडर का काम बरसात के कारण थोड़ा विलंब हुआ है। खंभों में केबल जोड़ने का काम जारी है। अगले सप्ताह तक स्ट्रीट लाइट शुरू कर दी जाएगी।
**- प्रशांत जानकर,** विद्युत अभियंता, मीरा-भायंदर मनपा

**दो-तीन महीने से चल रही है समस्याः** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया के जिला अध्यक्ष देवेंद्र शेलेकर ने कहा कि नवरात्र चल रही है। बड़ी संख्या में गरबा डांडिया खेलने महिलाएं खासकर लड़कियां घर से बाहर निकल रही हैं। सड़क पर अंधेरा होने की वजह से राहगीरों को राह चलने में दिक्कत होती है। लड़कियों और महिलाओं से छेड़खानी और चेन स्नेचिंग की घटना होने का डर बना रहता है। उन्होंने कहा कि दो-तीन महीने से यही हाल है।

**मनपा करे उजाले का इंतजामः विरानीः** स्थानीय पूर्व भाजपा नगरसेवक अनिल विरानी ने कहा कि स्टेशन से लेकर भक्ति वेदांत हॉस्पिटल तक सड़क के बीच का डिवाइडर ऊंचा करने का काम शुरू है। इसके चलते पुरानी स्ट्रीट लाइट निकाल दी गई थी, लेकिन नई लाइट्स शुरू करने में विलंब हो रहा है। मीरा-भायंदर मनपा को अस्थाई लाइट्स लगाकर उजाले का इंतजाम करना चाहिए था।

# नाबालिग बेटी से दुराचार, सौतेले पिता को पुलिस ने किया गिरफ्तार

**भास्कर संवाददाता।** विरार. नालासोपारा में रहनेवाले सौतेले पिता ने बेटी की अस्मत लूट ली। पिता, बेटी को जान से मारने की धमकी देकर एक साल से दुराचार की वारदात को अंजाम दे रहा था। इस मामले में नाबालिग लड़की की शिकायत पर पेल्हार पुलिस ने मामला दर्ज कर आरोपी पिता को गिरफ्तार किया है। क्राइम पीआई कुमार गौरव धंदवाड ने बताया कि पीड़ित लड़की नालासोपारा (पूर्व) की निवासी है। उसकी मां ने दूसरा विवाह किया था। सभी लोग घर में एक साथ रहते हैं। आरोपी ने पांच अक्टूबर की रात जब वारदात को अंजाम दे रहा था, तभी उसकी मां ने देख लिया था।

CS CamScanner

The Times of India - P-8

THE TIMES OF INDIA, MUMBAI
TUESDAY, OCTOBER 8, 2024

# Inviting bids for abattoir in Bhayander sparks protests

Sandhya.Nair@timesofindia.com

**Mumbai:** The Mira Bhayander Municipal Corporation (MBMC), currently under the administration of Municipal Commissioner Sanjay Katkar, has initiated an online bidding process for the construction of a slaughterhouse within its jurisdiction. This decision has sparked protests from various political parties.

On Oct 3, the municipality released tenders for 11 development projects, which include a cycling and jogging track, a gymnasium, a school, and an abattoir. The bids are scheduled to be opened on Oct 11 at the civic headquarters in Bhayander. Independent MLA Geeta Jain has objected to the tendering process for the slaughterhouse, deeming it illegal. In a letter addressed to Katkar, Jain pointed out that while a slaughterhouse is proposed in the Development Plan, it is still awaiting approval. She expressed concern over the potential health risks posed by an abattoir to the local villagers.

In Dec 2022, the municipality had commenced the land acquisition process for a slaughterhouse in Utan, Bhayander (west), which was met with strong opposition from over 5,000 residents who wrote to chief minister Eknath Shinde. The residents are already engaged in a battle against the civic dumping ground in Utan and the burning of garbage. A Solid Waste Management project at Dhagvi village in Utan was halted in Sep 2009, following massive protests by the locals.

According to the tender, the construction of the slaughterhouse is estimated to cost Rs 40 crore and is expected to be completed within 30 months. The funds for the abattoir and other development projects in Mira-Bhayander were approved by the state Urban Development Department from Ovala-Majiwada MLA Pratap Sarnaik's funds. The funds were later transferred to the Late Balasaheb Thackeray Memorial Art Gallery in Bhayander. Former BJP MLA Narendra Mehta has threatened to organise a large-scale protest if the tender for the slaughterhouse is not withdrawn. He argued that the abattoir would offend the religious sentiments of the majority community and questioned the necessity for such a facility in the region.

The Indian Express P-7

## 4 held as Palghar woman dies in wall collapse

Palghar: Four persons were arrested following the collapse of a wall that killed 22-year-old Raksana Lahange on October 4. The incident occurred at an under-construction site in Vasai. Police were informed post-cremation, leading to charges against landowners and contractors under sections of Bharatiya Nyaya Sanhita. PTI

The Free Press Journal, P-8

# Six horses sent to animal shelter for medical checkups; trio served notices

They allegedly confessed that the event was held to mark Urus Yatra, an annual festival which is observed in Uttan. Six horses, which were whipped to gallop faster, have been for medical examinations to Pashu Ashram, an animal rescue centre.

After PETA's alert, the cops swiftly set up barricades on the race route and intercepted two horse carts, while they were crossing the Versova bridge on the highway in Kashimira a little past midnight. The riders – Owen DeMello, 26, and Roncy Kaitil, 36, – were taken to the police station. They confessed to have organised the race from the Uttan village to the Versova bridge. Simultaneously, another rider, Benny Pereira, 40, was caught near the Neelkamal Junction. "While reports of the medical examinations of the horses are awaited, the trio were let-off after being served with notices." said a cop. The trio have been booked under the Bharatiya Nyaya Sanhita sections pertaining to negligent conduct with respect to animals as well as the Prevention of Cruelty to Animals Act.